# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १३८९६ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ०१ जुलै, २०२२

**:: परिपत्रक ::**

विषय: **महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांनी विधान भवन, मुंबई येथे प्रवेश मिळण्यासाठी कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने पाळावयाच्या सूचनांबाबत ...**

महाराष्ट्र विधानसभेचे **विशेष अधिवेशन दिनांक ३ व ४ जुलै, २०२२** रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार आहे. विशेष अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) शासकीय मुख्य प्रतोद / प्रतोद यांचे एका स्वीय सहायकास विधान भवन प्रवेश पत्रिका देण्यात येईल.

(२) विधानसभा विशेष अधिवेशन सन २०२२ करिता संसदीय कार्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग वित्त व नियोजन विभाग व विधी व न्याय विभाग या विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी केवळ आवश्यक असतील तेवढेच अधिकारी व कर्मचारी यांची नावे त्यांच्या विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) विशेष अधिवेशनाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रवेशपत्रिकेवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिका धारण करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

(४) विशेष अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(५) **कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

.. २/-

वरील सुरक्षाविषयक तसेच, कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात आलेल्या सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीस्तव:**

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी विधान भवन, मुंबई.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी विधान भवन, मुंबई.

**प्रति :**

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तसेच मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

**याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

(१) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
(२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.